मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पाणी तुंबल्यास अधिकाऱ्यांवर कारवाई!

## पाणी तुंबण्याच्या घटना घडल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई : महापालिका आयुक्तांचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील चिंचवड, आकुर्डी, चिखली भागांत रविवारी पाऊण तासात कोसळलेल्या ११४.५ मिली मीटर पावसाने सर्वत्र पाणी साचल्याने महापालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पावसाळ्यापूर्वी करण्यात येणारी नालेसफाई ही शंभर टक्के झाली असल्याचा महापालिकेचा दावा फोल ठरला आहे. त्यामुळे आता यापुढील पावसात पाणी तुंबण्याच्या घटना घडल्यास जबाबदारी निश्चित करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रभारी आयुक्त राहुल महिवाल यांनी दिला आहे.



शहरात झालेल्या पावसात आनंदनगर, निगडी ओटास्कीम, विद्यानगर, दत्तनगर, शंकरनगर, शाहूनगर, मोरेवस्ती आदी भागांमधील घरांमध्ये पावसाचे पाणी शिरले होते.तर, चिखलीतील घरकुल योजनेच्या परिसरात सर्वत्र पाणी साचले. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी महापालिका प्रशासनाच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त केला. स्पाईन रोड जाधववाडी परिसरात सोमवारी सायंकाळीही पाणी रस्त्यावर तसेच होते. पहिल्याच पावसात रस्त्यावर पाणी साचल्याने महापालिकेच्या कामावर पाणी पडले.

पावसाळ्यापूर्वी करण्यात येणारी नालेसफाई ही शंभर टक्के झाली असून सांडपाणी वाहिन्या आणि पावसाळी गटारांची स्वच्छता केल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला होता. मात्र, हा दावा किती फोल होता याची प्रचिती रविवारी झालेल्या पहिल्याच पावसात आली. शहरात विविध ठिकाणी रस्त्यांवर, तसेच सखल भागामध्ये तळेसदृश पाणी साचले होते. आनंदनगर परिसरात सांडपाणी वाहिनीत कचरा अडकल्याने सांडपाणी आणि पावसाचे पाणी नागरिकांच्या झोपड्यांमध्ये शिरले. त्यामुळे त्यांचे साठवलेले धान्याचे नुकसान झाले. आनंदनगरमध्ये ऐन पावसाळ्यात सांडपाणी वाहिनीचे काम सुरू होते. या परिसरात नालेसफाई झाली नाही, असा आरोप नागरिकांनी केला.

> पाणी तुंबल्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे. सर्व प्रभागातील संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना पाहणी करण्याच्या सूचना केल्या आहेत. सांडपाणी वाहिन्या आणि पावसाळी गटारांच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यास सांगितले आहे. यापुढील पावसात पाणी तुंबण्याच्या घटना घडल्यास जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात येईल.
> - राहुल महिवाल, प्रभारी आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.

सांडपाणी वाहिन्यांतील पाणी पावसाच्या पाण्यात मिसळून घराघरांत गेल्याची परिस्थिती दत्तनगर, विद्यानगर, शंकरनगर आदी भागांत पाहावयास मिळाली. निगडी ओटास्कीम येथील झोपड्यांमध्ये देखील पावसाचे पाणी शिरले. त्यामुळे नागरिकांची गैरसोय झाली. चिखलीतील महापालिकेच्या घरकुल योजनेच्या परिसरात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पहिल्याच पावसात तळ्याचे स्वरूप आले होते. त्यामुळे नागरिकांना घराबाहेर पडणेदेखील कठीण झाले होते. शहरातील झोपड्यांमध्ये शिरलेले पाणी लक्षात घेता महापालिकेने पावसाळापूर्वी कोणतेही काम व्यवस्थित केले नसल्याचे समोर आले आहे.

ज्या भागात पाऊस झाला, त्याभागात संपूर्ण नालेसफाई झाली होती. कमी कालावधीत जास्त पाऊस झाल्याने नालेही ओसंडून वाहत होते. काही सांडपाणी वाहिन्या आणि पावसाळी गटारांमध्ये प्लॅस्टिक, कचरा अडकल्याने पाणी तुंबले. पाऊस थांबल्यानंतर एक ते दीड तासात संपूर्ण पाणी वाहून गेल्याचा दावा आरोग्य विभागाचे सहायक आयुक्त यशवंत डांगे यांनी केला.

# निगरगट्ट प्रशासनास जाग कधी येणार

## इंद्रायणी नदीतील प्रदुषण थांबवा:नगरसेवक वसंत बोराटे

**पिंपरी | प्रतिनिधी**

आषाढी वारीनिमित्त राज्याच्या कानाकोपऱ्यातून वारकरी शहरात दाखल होतात. पवित्र इंद्रायणी मातेचे दर्शन घेऊन स्नान करतात. त्यांच्या आरोग्याला धोका आहे. मात्र इंद्रायणी नदी मातेची दुर्दशा थांबवण्यासाठी प्रशासनाकडे मागील आठ वर्षापासून पाठपुरवा सुरु आहे. केमिकलयुक्त पाण्यामुळे इंद्रायणी नदी फेसाळली आहे, सातत्याने हे रूप पहायला मिळत आहे. शहरवासियांसाठीही धोक्याची घंटा आहे. लवकरात-लवकर नदीप्रदूषण न थांबविल्यास जन आंदोलन घेऊ असा इशारा नगरसेवक वसंत बोराटे यांनी प्रशासनाला आणि 1दोन दिवसांपूर्वी इंद्रायणीनदी फेसाळल्यामुळे त्याची कारणे शोधण्यासाठी नदीची पाहणी केली. त्या दरम्यान नदीची अवस्था बघून पर्यावरणाचा ऱ्हास कशाप्रकारे सुरु झाला हे चित्र डोळ्यासमोर उभे राहिले. नदीप्रदूषणामुळे अनेक माशांचा जीव गेलाच, मात्र मानव जातीलाही धोका निर्माण झाला आहे. मोशी परिसरातून अनेक संस्था, संघटना, नगरसेवक, सामाजिक कार्यकर्त्यांनी



> इंद्रायणी नदीला आपण माता असा दर्जा देतो. या मातेची केविलवानी अवस्था पाहून अस्वस्थ झाले. मागील आठ वर्षापासून अवस्था थांबविण्यासाठी महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करतो आहे. आता बस लवकरात-लवकर उपाययोजना न केल्यास जनआंदोलन उभे करू, इंद्रायणी मातेला आपण सारे वाचवू....
> - वसंत बोराटे, नगरसेवक.

नदीप्रदूषण थांबविण्यासाठी आवाज उठविला, रॅली, आंदोलन केले. मात्र महापालिका प्रशासनाला जाग आलेली नाही. राज्य सरकार आणि महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने गांभिर्याने लक्ष देऊन उपाययोजना कराव्यात. इंद्रायणी मातेची दुर्दशा थांबवावी. मोशीची वेगळी ओळख इंद्रायणी नदीमुळे आहे, ही ओळख चांगल्या प्रकारे जपण्यासाठी मोशीकर म्हणून सर्वांनीच प्रयत्न करू, लवकरात-लवकर उपाययोजना सुरु न केल्यास जनआंदोलन उभे करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

# अल्पवयीन आरोपीला जामीन मंजूर!

## अल्पवयीन आरोपीची 33 दिवसांनी बालसुधारगृहातून सुटका : आरोपीचे आई-वडील सध्या तुरुंगात

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे हिट अँड रन प्रकरणी एक मोठी अपडेट समोर येत आहे. पुण्याच्या कल्याणीनगर अपघात प्रकरणातील मुख्य अल्पवयीन आरोपीला आज अखेर जामीन मंजूर झाला आहे. मुंबई हायकोर्टाकडून अल्पवयीन आरोपीला जामीन मंजूर झाला आहे. अल्पवयीन आरोपीच्या आत्याने मुंबई हायकोर्टात याचिका दाखल केली होती. या याचिकेत अल्पवयीन आरोपीला बेकायदेशीरपणे कोठडीत ठेवल्याचा आरोप त्याच्या आत्याने केला होता.



### नेमकं काय-काय घडलं?

» पुण्यात 18 मे च्या मध्यरात्री आणि 19 मे च्या पहाटेच्या अडीच वाजेच्या सुमारास कल्याणीनगर परिसरात अपघाताची घटना घडली होती. एका बड्या उद्योगपतीच्या मुलाने भरधाव वेगात गाडी चालवत दोन जणांना चिरडलं होतं. गाडी चालवणारा हा अल्पवयीन असल्याची माहिती समोर आली होती. आरोपीने बारावी परीक्षेत उत्तीर्ण झाल्याने त्याच्या मित्रांना पबमध्ये पार्टी दिली होती. त्याने मद्यप्राशन केलं होतं. त्याने नशेत महागडी पोर्शे कार भरधाव वेगात कल्याणीनगरच्या रस्त्यांवर चालवली. या दरम्यान त्याने एका दुचाकीला धडक दिली. या दुचाकीवर अनिस अहुदिया आणि अश्विनी कोष्टा हे दोन तरुण-तरुणी होते. त्यांचा अपघातात जागीच मृत्यू झाला होता. या अपघातानंतर तिथल्या स्थानिकांनी अल्पवयीन आरोपीस पकडून मारहाण केली होती. त्यानंतर घटनास्थळी पोलीस आले होते. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतलं होतं. या प्रकरणी पोलिसांवरही अतिशय गंभीर आरोप झाले होते.

हायकोर्टाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतला होता. त्यानंतर निर्णय राखून ठेवला होता. अखेर हायकोर्टाकडून या प्रकरणी निकाल देण्यात आला. या निकालात अल्पवयीन आरोपीला मोठा दिलासा मिळाल्याचं बघायला मिळत आहे. विशेष म्हणजे कल्याणीनगर अपघात घटनेत बाईकवर असलेल्या तरुण आणि तरुणीचा मृत्यू झाला होता. या दोघांच्या आई-वडिलांनी नुकतंच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. या भेटीत मुख्यमंत्र्यांनी संबंधित घटनेचा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवणार असल्याचं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं होतं. त्यानंतर आज हायकोर्टाने अल्पवयीन आरोपीला जामीन मंजूर केला आहे. त्यामुळे या आरोपी तरुणाची बालसुधारगृहातून सुटका होणार आहे.

या प्रकरणी कोर्टाने महत्त्वाचं निरीक्षण नोंदवलं आहे. या प्रकरणी पहिल्यांदा जामीन दिल्यानंतर पुन्हा ताब्यात घेणं बेकायदेशीर असल्याचं मुंबई हायकोर्टाने म्हटलं आहे. तसेच अल्पवयीन आरोपीचे आई-वडील सध्या तुरुंगात आहेत. त्यामुळे त्याचा ताबा आता त्याच्या आत्याकडे देण्यात येणार असल्याचं कोर्टानेच स्पष्ट केलं आहे. विशेष म्हणजे या प्रकरणी अल्पवयीन आरोपीची 33 दिवसांनी बालसुधारगृहातून सुटका होत आहे.

आरोपी अल्पवयीन मुलगा हा पुण्यातील ख्यातनाम बिल्डर विशाल अग्रवालचा मुलगा असल्याची माहिती नंतर समोर आली. या प्रकरणी आरोपीला घटनेच्या अवघ्या काही तासांनी बाल हक्क न्याय मंडळाकडून अल्पवयीन असल्याच्या मुद्द्यावरुन जामीन मिळाला होता. केवळ 300 शब्दांच्या निबंध लेखणाच्या शिक्षेच्या अटीवर त्याला जामीन मंजूर झाला होता. या प्रकरणी पोलिसांवर जोरदार टीका झाल्यानंतर पोलीस, सरकार यांच्यावरील दबाव वाढला होता. या प्रकरणी जसजसा तपास पुढे सरकत गेला तसतशा अनेक धक्कादायक गोष्टींचा खुलासा होत गेला. पण अखेर या प्रकरणी आता अल्पवयीन मुलाला जामीन मंजूर झाला आहे.

# कात्रज-कोंढवा रस्त्याचा निधी अडला कुठे?

## मंजूर निधी न आल्याने काम बंद : विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर पुन्हा घोषणा होणार असल्याची चर्चा

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने नागरिकांना खूश करण्यासाठी मंत्रिमंडळाच्या बैठकीत पुण्यातील कात्रज-कोंढवा रस्त्यासाठी १४० कोटी रुपये महापालिकेला देण्याच्या निर्णयाला मान्यता दिली आहे. त्यानंतर निधी येईल, असे महापालिकेला वाटले होते. मात्र अद्यापही निधी न आल्याने या रस्त्याचे काम बंद पडले आहे.



### पुण्याला तीन मंत्री, तरीही प्रश्न सुटेना

» पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे अर्थमंत्रिपदाचा कार्यभार आहे. त्यांनीच लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेपूर्वी कात्रज-कोंढवा रस्त्यासाठी निधी देण्याचे जाहीर केले होते. तसेच लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात "माझ्याकडे अर्थखाते आहे, त्यामुळे निधीची काळजी करुन नका मतदान करा," असे अजित पवारांनी जनतेला सांगितले होते. पवार हे शब्द पाळणारे नेते म्हणून ओळखले जातात. मात्र त्यानंतरही निधी न आल्याने उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे. अजित पवार तसेच चंद्रकांत पाटील राज्यात मंत्री आहेत. त्याचबरोबर मुरलीधर मोहोळ यांच्या रुपात केंद्रीय राज्यमंत्रिपद मिळाले आहे. त्यामुळे निधी मिळविण्यासाठी एवढी प्रतीक्षा का करावी लागत आहे, असा प्रश्नही नागरिकांनी उपस्थित केला आहे.

काम रखडल्याने या रस्त्यावर अपघातांचे प्रमाण वाढले आहे. गेल्या आठवड्यात अल्पवयीन मुलींना जीव गमवावा लागला होता. त्यानंतरही राज्य सरकारला जाग येत नसल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. आता हा निधी विधान सभा निवडणुका जाहीर झाल्यानंतर मतदारांना खूश करण्यासाठी महापालिकेच्या खात्यावर जमा केली जाईल, अशी चर्चा रंगली आहे.

कात्रज-कोंढवा रस्त्याच्या कामाचे भूमीपूजन केंद्रीय मंत्र्यांच्या हस्ते २०१९ मध्ये झाले आहे. या रस्त्यासाठी निधी मंजूर होऊन वेगाने काम पूर्ण केले जाईल, असे सांगण्यात आले होते. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याने अनेकांना जीव गमवावा लागला आहे. रस्त्याचे काम संथ गतीने सुरु होते. त्यावेळीदेखील अपघातांचे सत्र सुरुच होते. अलीकडच्या काळात निधी नसल्याने रस्त्याचे काम बंद पडले आहे. त्यामुळे या रस्त्यावरुन जाताना वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या अवघ्या एक दिवस आधी हा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतल्याने निधी महापालिकेच्या खात्यावर जमा होईल, असा दावा करण्यात आला होता. परंतु याबाबतचा केवळ शासन आदेश आला असून अद्याप एकही रुपया जमा झालेला नाही. राज्य सरकारच्या विभागातून पैसे पाठवण्यात आले असल्याचे सांगितले जात आहेत. मग पैसे नेमके कोठे अडकले आहेत? कोणी अडवून ठेवले आहेत, याची माहिती महापालिकेच्याच अधिकाऱ्यांना समजत नसल्याची माहिती समोर आली आहे.

# गुन्हेगारांवरील 'खाकी वर्दी'चा धाक लयाला

## दिवसाढवळ्या गोळीबार, कोयता गँगचे जाळे आणि खुनांच्या घटना यामुळे मावळ तालुक्यात गुन्हेगारांनी डोकेवर काढले

**पिंपरी | प्रतिनिधी**

दिवसाढवळ्या गोळीबार, कोयता गँगचे जाळे आणि खुनांच्या घटना यामुळे मावळ तालुक्यात गुन्हेगारांनी डोकेवर काढले आहे. प्रामुख्याने राजकीय वाद तसेच जमीन खरेदी विक्रीच्या व्यवहारामधून हे गुन्हे घडत आहेत. अनेक तडीपार गुन्हेगारांना मावळाचा आश्रय घेतला असून गुन्हा करायचा आणि स्वतःच्या जवळच्या पोलिसांना पैसे देऊन त्यांच्यासमोर हजर व्हायचे ही पद्धत सुरू आहे. त्यामुळे, पोलिसांचाही गुन्हेगारांना धाक राहिला नसल्याचे दिसून येत आहे.

पुणे - मुंबई द्रुतगती महामार्ग बनविताना जमिनींचे कथित गैरव्यवहार माहिती अधिकार कार्यकर्ते सतीश शेट्टी यांनी माहिती अधिकाराच्या माध्यमातून समाजासमोर आणले होते. या घोटाळ्या प्रकरणी १३ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, त्याने शेट्टी यांना धमक्या येत होत्या. त्यामुळे, त्यांनी पोलिस संरक्षणाची मागणी केली होती. मात्र, त्यांना पोलिस संरक्षण मिळाले नाही. त्यानंतर १३ जानेवारी २०१० ला त्यांचा खून झाला. सर्व खुनांच्या बऱ्याच घटना घडल्या. त्या पाहता तालुक्यातील सर्व राजकीय मंडळींनी तालुका गुन्हेगारांचा अड्डा होण्यापासून वाचविण्यासाठी आपापसातले मतभेद बाजूला ठेवून एकत्र येणे गरजेचे आहे.

पुणे ग्रामीण जिल्हा पोलिसांच्या अभिलेखावर लोणावळा उपविभागात नऊ टोळ्या असून सक्रिय टोळ्यांवर तडीपार आणि हद्दपारीची कारवाई चालू आहे. काही टोळ्यांवर मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येत आहे. पुणे ग्रामीण जिल्ह्यात अद्याप २३ अग्निशस्त्रे, २४ काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. शस्त्रे बाळगणाऱ्यांवर देखील कठोर कारवाई करण्यात येत आहे. खाकी वर्दीचा धाक, दरारा कायम राहिला तरच गुन्हेगार, समाजकंटक त्यांच्या मर्यादेत राहतील. सर्वसामान्य जनतेच्या मनात सुरक्षितता आणि मोकळेपणाची भावना निर्माण होईल. मात्र, गेल्या काही महिन्यांमध्ये थेट 'खाकी वर्दी'वरच हात टाकण्याच्या घटना घडल्या आहेत. एरवी वाहतूक पोलिसांसोबत वाद घालून त्यांना धक्काबुक्की करण्याच्या घटना घडत असतात.



### गुन्हेगारांना लगाम घालण्याचे प्रयत्न

» मावळमधील गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी पोलिस आयुक्त विजयकुमार चौबे यांनी तळेगाव दाभाडे येथे गुंडा विरोधी पथकाचे कार्यालय स्थलांतरित केले. तरी देखील गोळीबारासारख्या घटना घडतच आहेत. गुन्हेगारांना लगाम घालण्यासाठी पोलिसांनी कठोर पावले उचलण्यास सुरवात केली आहे. गुन्हेगारांची कुंडली काढण्यासाठी साध्या वेशातील पोलिसांची नियुक्ती केली आहे.

> पुणे ग्रामीण जिल्हा पोलिसांच्या अभिलेखावर लोणावळा उपविभागात नऊ टोळ्या असून सक्रिय टोळ्यांवर तडीपार आणि हद्दपारीची कारवाई चालू आहे. काही टोळ्यांवर मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येत आहे. पुणे ग्रामीण जिल्ह्यात अद्याप २३ अग्निशस्त्रे, २४ काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. शस्त्रे बाळगणाऱ्यांवर देखील कठोर कारवाई करण्यात येत आहे
>
> - अविनाश शिळीमकर, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण.

### प्रमुख गुन्हेगारी घटना

» शिरगाव येथील सरपंच प्रवीण गोपाळे यांची १ एप्रिल २०२३ ला हत्या. जनविकास समितीचे संस्थापक किशोर आवारे यांचा १२ मे २०२३ ला भरदिवसा खून. २४ एप्रिलला २०२४ ला आदित्य भेगडे यांच्यावर गोळीबार.चोरट्यांकडून ९ मे २०२४ ला तळेगावच्या मस्करनेस कॉलनीमध्ये गोळीबार.टोळक्याकडून दुचाकीवरून फिरत २० जून २०२४ला चार ठिकाणी गोळीबार

### राजकीय वाद, जमीन व्यवहारातून प्रकार

» मावळ तालुक्यात यापूर्वी राजकीय वादातून काही खून झाले आहेत. किशोर आवारे यांच्या खुनानंतर सतीश शेट्टी, बंटी वाळुंज, सचिन शेळके, बाळासाहेब केदारी यांच्या खुनांच्या घटनांचा प्रामुख्याने उल्लेख होत आहे. या सर्व घटना राजकीय वाद आणि जमिनीच्या व्यवहारांच्या वादातून झाल्या आहेत.

# शालेय साहित्य खरेदीसाठी शाळांकडून सक्ती

## पालकांनी विद्यार्थ्यांची वह्या-पुस्तके, गणवेश शाळेतूनच घ्यावे किंवा आम्ही सांगू त्या दुकानातून घ्यावेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पालकांनी विद्यार्थ्यांची वह्या-पुस्तके, गणवेश शाळेतूनच घ्यावे किंवा आम्ही सांगू त्या दुकानातून घ्यावेत, अशी सक्तीच शहरातील इंग्रजी माध्यमाच्या बहुसंख्य शाळा करत आहेत. त्याद्वारे शाळा आणि विक्रेते प्रचंड नफेखोरी करत आहेत. राजरोस हे घडत असतानाही महापालिकेचा शिक्षण विभाग त्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करत आहे. अशा शाळांवर कधी कारवाई होणार? याकडे पालकांचे लक्ष लागले आहे.

शहरातील इंग्रजी शाळांत सध्या नवीन शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. त्याचवेळी ठरावीक प्रकाशकांचे शैक्षणिक साहित्य, लोगो असलेला गणवेश, स्कूल बॅग, शूजचा स्वतंत्र पॅटर्नच शाळांनी तयार केला आहे. हे साहित्य शाळेव्यतिरिक्त विशिष्ट ठरावीक दुकानांमध्येच मिळत आहे.

शाळा व्यवस्थापनाकडून शैक्षणिक साहित्य खरेदीची सक्ती केली जात असेल; तर पालकांनी लेखी तक्रारी कराव्यात. शाळा व्यवस्थापनाने अशा पद्धतीने नफेखोरी करू नये, शाळेविरुद्ध योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असा इशारा महापालिका शिक्षण विभागाने याअगोदरच दिला आहे. मात्र, शाळांनी याकडे दुर्लक्ष केले.

गणवेश आणि पुस्तकांबाबत विचारले असता तुम्ही प्रवेश घ्या, पुस्तके आणि गणवेशाबाबत सांगू. आमचे व्हेंडर आहेत. त्या व्हेंडरकडूनच पुस्तके व अन्य साहित्य घ्यावे लागेल, असे सांगितले. किती खर्च येईल ? याबाबत सांगितले जात नाही. पालक शीतल वाकडे यांनी सांगितले नाही.




### शाळांच्या आवारातच दुकाने ?

» अनेक शाळांच्या आवारात शालेय साहित्य विक्रीची दुकाने थाटली आहेत. तर काही शाळांच्या आवारात ट्रकने साहित्य उतरविण्यात येत आहे. गणवेश आणि पुस्तकांबरोबरच शाळेने शैक्षणिक साहित्य विशेष प्रकारे डिझाइन केले आहे. त्यामुळे, पालकांना ते बाहेर मिळणार मिळतच नाही, असे एका निगडीतील नामांकित शाळेतील पालक संतोष शिंदे यांनी सांगितले..

### अवास्तव दरात साहित्य विक्री

» अनुदानित, विनाअनुदानित, स्वयंअर्थसाहाय्यित, कायम विनाअनुदानित खासगी प्राथमिक शाळांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. त्यामध्ये अनेक शाळांकडून शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याची सक्ती पालकांवर केली जात आहे. अवास्तव दरात शालेय साहित्य विक्री होत असल्याने पालकांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

# एल थ्री पबवर महापालिकेचा हातोडा

## 'त्या' तिघांनी रात्रीत उधळले 85 हजार! फर्ग्युसन रोडवरील एल थ्रीममधील प्रकार

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील पब, बारमध्ये नियमांचे उल्लंघन होत असून, पहाटेपर्यंत तेथे पार्ट्या सुरु आहेत. त्यातच पबमध्ये होणाऱ्या पार्ट्यांमध्ये तरुणांकडून अंमली पदार्थांचे सेवन केले जात असल्याचे समोर आले आहे.

गोपाळ कृष्ण गोखले रस्त्यावरील (फर्ग्युसन महाविद्यालय रस्ता) लिक्विड लेझर लाउंज (एल थ्री) पबवर आज (ता. २५) महापालिकेच्या बांधकाम विभागाने कारवाई केली. कोणतीही परवानगी न घेता इमारतीमध्ये केलेल्या अंतर्गत बदलामुळे हे बेकायदेशीर बांधकाम पाडून टाकण्यात आले. त्यासह शहरातील अन्य रुफटॉप, बार, पब सह एकूण २६ ठिकाणी कारवाई करून सुमारे ३६ हजार ५०० चौरस फुटांचे अनधिकृत बांधकाम पाडून टाकण्यात आले आहे.

शहरातील पब, बारमध्ये नियमांचे उल्लंघन होत असून, पहाटेपर्यंत तेथे पार्ट्या सुरु आहेत. त्यातच पबमध्ये होणाऱ्या पार्ट्यांमध्ये तरुणांकडून अंमली पदार्थांचे सेवन केले जात असल्याचे समोर आले आहे. गेल्या महिन्यात पबमध्ये दारू पिऊन अल्पवयीन मुलाने भरधाव पोर्शे ही महागडी गाडी चालवून दोघांचा बळी घेतला. त्यानंतर पोलिस, राज्य उत्पादन शुल्क विभाग, महापालिकेतर्फे कारवाई सुरु असल्याने पबचालकांचे धाबे दणाणले आहेत. हे प्रकरण शांत होत नाही तोपर्यंत फर्ग्युसन रस्त्यावरील एल थ्री पबमध्ये पहाटेपर्यंत पार्टी सुरु होती. त्याचे व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल झाले आहेत. याप्रकरणात पोलिसांचे निलंबन झाले असून, पब चालक भागिदारांना अटक झाली आहे. विधिमंडळ अधिवेशनात राज्य सरकारला या प्रकरणात विरोधकांच्या प्रश्नांना सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे कारवाईचा बडगाही उचलला जात आहे.




### एक पुण्यातून तर दुसरा मुंबईतून पोलिसांच्या ताब्यात

» पुण्यातील एफसी रोडवरील एल थ्री या बारमध्ये ड्रग्ज पार्टी झाल्याचे समोर आल्याने शहरात मोठी खळबळ उडाली होती. तसेच याचे व्हिडिओही व्हायरल झाले होते. आता व्हायरल व्हिडिओमध्ये ड्रग्जचे सेवन करताना दिसणारा दोन तरुणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांची नावे नितीन ठोंबरे आणि करण मिश्रा अशी आहेत. यातील एकाला पुण्यातून तर दुसऱ्या मुंबईतून पुणे पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पोलीस असा त्यांना रुग्णालयात दाखल करून त्यांच्या रक्ताचे नमुने घेणार आहेत.

> पार्टीला उपस्थित असणाऱ्या ४० ते ४५ मुलांची चौकशी सुरू करण्यात आली आहे. अमली पदार्थ सेवन करणाऱ्या तरुणांनी त्या रात्री ८० ते ८५ हजार रुपयांचा खर्च केल्याची माहिती मिळाली आहे. पबमध्ये काही अल्पवयीन मुले असल्याची शक्यता आहे. त्या रात्री पबमध्ये असलेल्या ४० ते ४५ तरुणांची चौकशी सुरू करण्यात आली असून, त्यादृष्टीने पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे
>
> \- संदीपसिंग गिल, पोलिस उपायुक्त, परिमंडळ एक

### अन् पोलिस बंदोबस्त मिळाला

» महापालिकेला अतिक्रमण काढण्यासाठी, अनधिकृत बांधकाम पाडण्यासाठी पोलिस बंदोबस्त मिळत नसल्याने कारवाई करता येत नाही. मात्र एल थ्री पब प्रकरणानंतर मुख्यमंत्री शिंदेंनी पोलिसांनाच अनधिकृत पब पाडून टाका असे आदेश दिले आहेत. त्यामुळे पोलिसांचे धाबे दणाणल्याने आज महापालिकेकडे पोलिसांनी स्वतःहून पोलिस बंदोबस्त देऊन शहरात कुठे कुठे कारवाई करायची आहे सांगा अशी मागणी केली. त्यामुळे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनाही वेगळा अनुभव आला.

### 'त्या' तिघांनी रात्रीत उधळले 85 हजार!

» नामदार गोपाळकृष्ण गोखले पथावर (फर्ग्युसन महाविद्यालय) असलेल्या लिक्विड लेझर लाउंज (एल थ्री) या बारमध्ये अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या तरुणांचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी आता 'त्या' मुलांचा शोध सुरू केला आहे. त्यांनी एका रात्रीत ८० ते ८५ हजार रुपये उडवल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात उघडकीस आले आहे. रविवारी रात्रभर झालेल्या पार्टीत काही अल्पवयीन मुले असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे.

# अमित शाह यांची हर्षवर्धन पाटील यांनी घेतली नवी दिल्लीमध्ये भेट

## साखर उद्योगासंदर्भात विविध विषयांवर 'चर्चा', अमित शाह यांचे सहकार मंत्रीपदी विराजमान झालेबद्दल अभिनंदन केले

**पुणे | प्रतिनिधी**

देशाचे गृह व सहकार मंत्री अमित शाह यांची राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष व माजी मंत्री, भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांनी नवी दिल्ली येथे सोमवारी (दि. 24) भेट घेतली. याभेटीमध्ये देशातील साखर उद्योगाच्या विविध मागण्यां संदर्भात चर्चा झाली. तसेच यावेळी हर्षवर्धन पाटील यांनी अमित शाह यांचे देशाच्या सहकार मंत्रीपदी दुसऱ्यांदा विराजमान झालेबद्दल अभिनंदन केले व शुभेच्छा व्यक्त केल्या.

याभेटीत राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या वतीने अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी उसाच्या देय एफ.आर.पी. मध्ये प्रत्येक वर्षी वाढ होत असून, सन 2019 पासून साखरेच्या किमान विक्री दरामध्ये (एम.एस.पी.) वाढ झालेली नाही. परिणामी, देशातील साखर उद्योगापुढे आर्थिक अडचणी वाढत आहेत. त्यामुळे केंद्र सरकारने साखरेचा किमान विक्री दर प्रति क्विंटल रु. 4200 करावा, अशी विनंती अमित शाह यांचेकडे केली.



या संदर्भातील साखर उत्पादन खर्चाच्या वस्तुनिष्ठ आकडेवाडीसह प्रस्तावाची हर्षवर्धन पाटील यांनी अमित शाह यांना माहिती दिली. तसेच देशातील साखर उद्योगाच्या सद्य:स्थितीची, आगामी गळीत हंगामातील संभाव्य साखर उत्पादन, इथेनॉल उत्पादन याची माहितीही अमित शाह यांना हर्षवर्धन पाटील यांनी दिली. दरम्यान, यावेळी केंद्र सरकार लवकरच राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाने दिलेल्या साखरेच्या एमएसपी वाढीच्या प्रस्तावावरती सकारात्मक निर्णय घेईल, असे अमित शाह यांनी स्पष्ट केले. यावेळी राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे उपस्थित होते.

नवी दिल्ली येथे राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या संचालक मंडळाची बैठक महासंघाच्या कार्यालयामध्ये सोमवारी (दि.24) संपन्न झाली. यावेळी देशातील झालेले साखर उत्पादन व इथेनॉल निर्मितीची सद्यस्थिती व आगामी ऊस गळीत हंगामा तसेच साखरेची एम.एस.पी. वाढ आदी विषयां संदर्भात सविस्तर आढावा घेण्यात आला.

### नवी दिल्लीत हर्षवर्धन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

» नवी दिल्ली येथे राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या संचालक मंडळाची बैठक महासंघाच्या कार्यालयामध्ये सोमवारी (दि.24) संपन्न झाली. यावेळी देशातील झालेले साखर उत्पादन व इथेनॉल निर्मितीची सद्यस्थिती व आगामी ऊस गळीत हंगामा तसेच साखरेची एम.एस.पी. वाढ आदी विषयां संदर्भात सविस्तर आढावा घेण्यात आला.